# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

क्रमांक कोविमं/प्रात्यक्षिक/ 734
दिनांक :- २०/०६/२०१९

प्रति,

प्राचार्य,

सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,

**विषय :- उच्च माध्यमिक प्र.परीक्षा जुलै २०१९ शास्त्र व गणित (४०) विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या व्यवस्थेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै २०१९ प्रात्यक्षिक परीक्षा ०९ जुलै २०१९ ते १६ जुलै २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील गणित(४०), भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयास प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची शास्त्र प्रात्यक्षिक परीक्षा खाली तक्त्यामध्ये नमूद केलेल्या आपल्या संबंधित तालुक्याच्यासमोर दर्शविलेल्या परीक्षा स्थळावर/केंद्रावर निर्धारित केलेल्या वेळेत घेण्यात येईल. त्याप्रमाणे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील उपरोक्त विषयांची ओएमआर गुणतक्ते संबंधित केंद्रांना देण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | समाविष्ठ असणारी तालुके | प्रात्यक्षिक परीक्षा केंद्र कनिष्ठ महाविद्यालय |
|---|---|---|
| १ | कराड (०२) व पाटण (०९) | यशवंतराव चव्हाण कॉलेज,कराड ता.कराड जि.सातारा (२१.०२.००२) फोन नं.०२१६४-२७१३५६ |
| २ | खंडाळा(०३),माण(०६) व फलटण(०८) | मुधोजी कॉलेज,फलटण ता.फलटण जि.सातारा (२१.०८.००१) फोन नं.०२१६६-२२२३३० |
| ३ | जावळी(०१),कोरेगांव(०५), महाबळेश्वर(०७) व वाई(११) | यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, सातारा जि.सातारा (२१.१०.००३) फोन नं.०२१६२-२३४३९२/२३७४०८ |
| ४ | खटाव(०४) व सातारा(१०) | लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा ता.जि.सातारा (२१.१०.००५) फोन नं.०२१६२-२३७९८६ |
| ५ | जत(०२),कवठेमहंकाळ(०४),मिरज(०६) व सांगली(०८) | विलिंग्डण कॉलेज, सांगली जिल्हा सांगली (२२.०८.००१) फोन नं.०२३३-३०२५१८०/३०२५१५४ |
| ६ | आटपाडी(०१),कडेगाव(०३), खानापूर(०५),पलूस(०७) व तासगांव(१०) | विद्यानिकेतन कृषी माध्यमिक विद्या. व ज्यु.कॉलेज, तासगाव जि.सांगली (२२.१०.००३) फोन नं.०२३४६-२४०१३३ |
| ७ | शिराळा (०९) व वाळवा (११) | कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली (२२.११.००१) फोन नं.०२३४२-२२१७७८ |
| ८ | आजरा(०१),चंदगड(०३),गडहिंग्लज(०४) व कागल(०७) | देवचंद कॉलेज,अर्जुननगर ता.कागल जि.कोल्हापूर (२३.०७.००१) फोन नं.०८३३८-२२०११२ |
| ९ | हातकणंगले (०६),पन्हाळा(१०) व शिरोळ(१३) | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर जि.कोल्हापूर (२३.०९.००२) फोन नं.०२३१-२६५८६१२ |
| १० | भुदरगड(०२), गगनबावडा(०५) करवीर (०८), कोल्हापूर(०९) राधानगरी(११), व शाहूवाडी(१२) | न्यू कॉलेज, कोल्हापूर जि.कोल्हापूर (२३.०९.००८) फोन नं.०२३१-२६२११८७ |

पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेसाठी/तोंडी परीक्षेस पुन्हा प्रविष्ठ व्हावे लागेल. विद्यार्थ्यांसाठी पूर्वीचे गुण ग्राहय धरण्यात येणार नाहीत. विद्यार्थ्यांना वरील कालावधीत उपरोक्त परीक्षा केंद्राशी संपर्क साधण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच शास्त्र व गणित (४०) विषयाखेरीज अन्य अभ्यासक्रमाच्या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा ज्या त्या संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामध्येच घेण्यात येतील याचीही नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर–४१६ ००४

परिपत्रक क्रमांक कोविमं/१२ वी प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा/ जुलै २०१९,दि.२०/०६/२०१९

**विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै २०१९ शास्त्र, तांत्रिक, व्यावसायिक व किमान कौशल्यावर आधारित विषयांच्या प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षेबाबत.**

या विभागीय मंडळाच्या कक्षेत येणाऱ्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, **जुलै २०१९** मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या शास्त्र, तांत्रिक, व्यावसायिक व किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा आणि कला व वाणिज्य शाखेच्या विषयांच्या तोंडी परीक्षा **दिनांक ०९/०७/२०१९ ते दिनांक १६/०७/२०१९** या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.आऊट ऑफ टर्न परीक्षा दि. ०५/०८/२०१९ रोजी आहे याची कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी व या तारखा विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

१) **शास्त्र व गणित प्रात्यक्षिक परीक्षा:–**

शास्त्र व गणित विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा प्रतिवर्षाप्रमाणे निर्धारित केलेल्या केंद्रावर आयोजित केली जाणार आहे. अशा केंद्राची माहिती प्रात्यक्षिक,तोंडी परीक्षा साहित्य वाटपासोबत देण्यात येईल, हे केंद्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून केंद्राशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेची तारीख व वेळ जाणून घेण्याबाबत विद्यार्थ्यास कळविण्यात यावे.

२) **भाषा व कला–वाणिज्य विषयाच्या तोंडी परीक्षा व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा :–**

भाषा व कला विषयाच्या तोंडी परीक्षा वरील कालावधीमध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांत आयोजित कराव्यात व ज्या विषयासाठी प्रकल्प अहवाल व जर्नल/सेमिनार नुसार गुण देण्याचे आहेत. या कालावधीतच विद्यार्थ्यांकडून प्रकल्प व जर्नल/सेमिनार अहवाल घेवून गुणदान करण्यात यावे जे विद्यार्थी पर्यावरण विषयास अनुत्तीर्ण आहेत त्यांचीही परीक्षा या कालावधीमध्ये आयोजित करुन त्याचे प्रकल्प व जर्नल फेब्रु–मार्च २०१९ परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या अंतर्गत व बाहय परीक्षकांची नियुक्ती करुन तपासून परीक्षा घेवून गुणदान करण्यात यावे. **( पर्यावरण विषयाची आऊट ऑफ टर्न परीक्षा घेता येणार नाही.)**

३) **एम.सी.व्ही.सी व बायफोकल विषय प्रात्यक्षिक परीक्षा :–**

एम.सी.व्ही.सी व बायफोकल विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर आयोजित करावी त्यासाठी फेब्रु–मार्च २०१९ परीक्षेस नियुक्त अंतर्गत व बहिस्थ परीक्षक यांचीच नियुक्ती करुन सदर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात यावी.

सर्व प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत महाविद्यालयीन अथवा अन्य प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन न करता केवळ उच्च माध्यमिक प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्रयोगशाळा व कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल याची खातर जमा करावी. ज्या विद्यार्थ्यांना निर्धारित कालावधीत **शास्त्र** प्रात्यक्षिक परीक्षा देता येणार नाही अशा विद्यार्थ्यांची **आउट ऑफ टर्न** प्रात्यक्षिक परीक्षा **सोमवार** दिनांक ०५/०८/२०१९ रोजी **१)यशवंतराव चव्हाण कॉलेज,सातारा २) विलिंग्डन कॉलेज,सांगली ३) न्यू. कॉलेज, कोल्हापूर** या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे त्यामुळे निर्धारित वेळेत जे विद्यार्थी फक्त प्रात्यक्षिक परीक्षा देवू शकणार नाहीत त्यांना संबंधित केंद्रावर पाठविण्यात यावे. याबाबतचे सविस्तर परिपत्रक या परिपत्रकासोबतच देण्यात आले आहे. ..

तसेच २ व ३ मधील पर्यावरण विषय सोडून इतर विषयाची आऊट ऑफ टर्न परीक्षा कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्यात यावी. आऊट ऑफ टर्न परीक्षेसाठी प्रतीविषय रुपये १०० प्रमाणे शुल्क आकारले जाईल व ते शुल्क चलनाद्वारे मंडळात जमा करावेत. शास्त्र व गणित विषयाचे आऊट ऑफ टर्न शुल्क वरील तीन केंद्रावर जमा करण्याबाबत विद्यार्थ्यास सुचित करावे.

या प्रमाणे प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे आयोजन करावे. परीक्षा संपल्यानंतर परीक्षेचे साहित्य खालीलप्रमाणे पाकिटामध्ये सीलबंद करुन वितरण केंद्रावर दिनांक १८/०७/२०१९ रोजी १० ते ४ या वेळेत जमा करावे.

**खालील दर्शविल्याप्रमाणे पाकिटे वितरण केंद्रावर जमा करावीत.:-**

१) प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका पाकिटे.
२) तोंडी/प्रकल्प/पर्यावरण विषयाचे गुणपत्रिका पाकिटे.
३) प्रात्यक्षिक परीक्षांचे गुणतक्ते पाकिटे
४) एम.सी.व्ही.सी. तोंडी/पर्यावरण/ प्रात्यक्षिक गुणतक्ते पाकिटे. (एम.सी.व्ही.सी.विभागाकडील)
५) देयकांचे पाकिटे
६) ग्रेडलिस्ट पाकिटे

**●महत्वाचे :- जुलै २०१९ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस जे पुनर्परीक्षार्थी प्रविष्ठ होणार आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांना ते प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विषयांची प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षा पुन:श्च देणे अनिवार्य राहील. या परीक्षेत जे श्रेणीसुधार विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार आहेत त्यांनी सुध्दा तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा देणे अनिवार्य आहे मात्र या विद्यार्थ्यांचे पर्यावरण विषयाचे गुण, व आरोग्य शारिरीक शिक्षण या विषयाची श्रेणी मागील परीक्षेचीच कळविण्याची आहे याची नोंद घ्यावी.**

वरीलप्रमाणे परीक्षा आयोजित करुन तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा साहित्य मंडळाने कळविलेल्या तारखांना जिल्हा वाटप केंद्रावर जमा करावे.

22.06

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्राचार्य, सर्व कनिष्ठ महाविद्यालये, सातारा/सांगली/कोल्हापूर.